**विशेष दिवाणी दावा क्र.२०/२०२६ मधील नि.१९ खालील आदेश**
**शंकर गणपत पवार वगैरे वि. गणपत दादा पवार**
**CNR NO.MHST050000732026**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) अन्वये दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादींनी सदरचा दावा हा दावा कलम १अ, १ब, १क व १ड या मिळकतींमध्ये वादींचा कायदेशीर असणारा १/५ हिस्सा वादींना अलग करुन वादींच्या कब्जे वहिवाटीस मिळावा, तसेच जाहीर ठराव, वाटप, ताकीद, दरम्यानचे उत्पन्न याकरीता दाखल केलेला आहे. वादींनी दाव्याचे कलम १ मध्ये प्रतिवादी क्र.१ हे मनोरुग्ण असलेचा तसेच त्यांना सध्या आपण काय करतो आहे हे देखील समजत नाही, तसेच कसलेही भान रहात नाही असा मजकुर नमूद केलेला आहे, तसेच त्याबाबत डॉ. क्षीरसागर यांचे उपचाराबाबतची फाईल दाखल केलेली आहे. अशी परिस्थिती असताना सी.पी.सी.आदेश ३२ नियम १५ अन्वये कोणतीही प्रक्रिया पूर्ण न करता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे वादीचा दावा कायद्याने चालू शकत नाही. वादीचे दाव्यास सी.पी.सी.आदेश ७ नियम ११ड मधील तरतुदींची बाधा येत असल्यामुळे दावा खर्चासह रद्द करणेची विनंती केली आहे.

३. वादींनी सदर अर्जास नि.५२ वर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविली आहे. वादींचे म्हणण्यानुसार, वादींनी प्रस्तुतचा दावा वाटप, जाहीर ठराव, निरंतर ताकीद व दरम्यानचे उत्पन्न मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी याकामी हजर होवून अद्यापपर्यंत दाव्यास कैफीयत व ताकीद अर्जास म्हणणे दाखल

केलेले नाही. वादींनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३२ नियम १५ अन्वये कोणतीही प्रक्रिया केलेली नाही त्यामुळे दावा रद्द करणेची मागणी बेकायदेशीर आहे. वादी यांनी सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ हे मनोरुग्ण असलेबाबत जाहीर ठराव होवून मागितलेला नाही अगर त्यासंबंधीची कोणतीही मागणी दाव्यात केलेली नाही. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे कसलेही प्रकारची मागणी दाव्यात नमूद नसलेने प्रतिवादीचा अर्ज कायद्याने चालणेस पात्र नाही. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणेचे कायद्यामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३२ नियम १५ प्रमाणेचे तरतुदी लागू पडत नाहीत. तो पुराव्याचा भाग आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज कॉस्टवर नामंजूर करण्याची विनंती केली अहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.३ यांनी नि.४३ वर लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे.

५. वादी यांनी दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ मनोरुग्ण असल्याबाबत कथन केले आहे. परंतु त्या अनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३२ नियम १५ प्रमाणे पुर्तता न केल्यामुळे दावा चालणेस पात्र नाही असे प्रतिवादीचे कथन आहे. तसेच वाद मिळकती या गणपत दादा पवार यांच्या वडीलार्जित मिळकती आहेत. गणपत दादा पवार व त्यांचे भाऊ यांच्यामध्ये वाटप झालेले आहे. दावा मिळकती या वाटपामधील प्रतिवादी क्र.१ यांना मिळाल्या असल्यामुळे दावा मिळकती या वडिलार्जित मिळकती आहेत असे म्हणता येणार नाही. त्यामुळे गणपत पवार यांच्या हयातीत वादी यांना, प्रतिवादी क्र.१ यांच्या हयातीत वाटप मागता येणार नाही. सदर म्हणण्याचे पृष्टयर्थ प्रतिवादीतर्फे खालील न्यायनिर्णय हजर करण्यात आलेले आहेत.

i) Uttam Vs. Saubhag Singh and others, (2016) AIR SC 1169.

ii) Shri Sadashiv D. Naik Vs. Shri Umesh Krishna Sawanth, (2013) 2 ALL MR 58.

६. प्रतिवादी क्र.१ हे मनोरुग्ण असल्याचे कथन वादीचे आहे. त्या अनुषंगाने पुर्तता करण्याकरीता न्यायालयातील सहा. अधिक्षक यांची नेमणूक करण्यात यावी असा अर्ज वादीतर्फे दाखल करण्यात आलेला आहे. तो अर्ज चौकशीकरीता प्रलंबित आहे. तसेच वाद मिळकती या प्रतिवादी क्र.१ याच्या स्वतंत्र मिळकती आहेत की वडीलार्जित मिळकती आहेत ही बाब पुराव्याअंती सिध्द होणार आहे. कायद्याप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे आदेश करतेवेळी केवळ दाव्यातील कथने विचारात घेणे महत्वाचे आहे. दाव्यातील कथनांनुसार सदरचा दावा चालणेस पात्र आहे. त्यामुळे सदर दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे कायदेशीर बाधा असल्याचे दिसून येत नाही. वादींना त्यांची केस मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा दावा हा अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव नामंजूर करता येणार नाही. नमूद अर्जातील कथने आदेश ७ नियम ११ च्या तरतुदीमध्ये बसत नसल्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.05.02 15:26:46 +0530

ठिकाण – कराड (जे.जे.माने)
दिनांक – ०२/०५/२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.